# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## परिपत्रक

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

जा.क्र.दूरशिक्षण/ 560 दि. 02 SEP 2026

विषय : - ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२६ हिवाळी सत्रामध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज सादर करणेबाबत.

संदर्भ : १. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी./३७३ दि. २७.०८.२०२६ रोजीचे पत्र.
२. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी./३६८ दि.२४.०८.२०२६ रोजीचे पत्र.

परीक्षा नियुक्ती विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील ऑक्टो/नोव्हे.२०२६ हिवाळी सत्रातील होणाऱ्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज स्विकारणेच्या तारखा, परीक्षा शुल्क व परीक्षा अर्ज सादर करणेच्या तारखाबाबत उपरोक्त संदर्भानुसार कळविलेल आहे. तसेच संदर्भिय क्र. २-नुसार परीक्षक नियुक्ती विभागाने यापूवी परीक्षेंच्या संभाव्य तारखा जाहिर केल्या आहेत. याबाबत सदरची परिपत्रके आपणास ई-मेलद्वारे अवगत करणेत आलेली आहेत. त्यानुसार आपल्या केंद्रावरील विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरणेबाबत खालीलप्रमाणे सूचना अवगत करणे याव्यात.

परीक्षा अर्ज सादर करणेच्या तारखा :

| | विनाविलंब शुल्क (पर्यंत) | विलंब शुल्क रू. ५०/-(पर्यंत) | अतिविलंब शुल्कासहीत रू. ३५०/-(पर्यंत) |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | दि. १.९.२०२६ ते दि. ११.०९.२०२६ | दि. १२.०९.२०२६ ते दि. १५.०९.२०२६ | दि. १६.०९.२०२६ ते दि. १८.०९.२०२६ |
| अभ्यासकेंद्रानी यांनी परीक्षा अर्ज ॲप्रुव्ह करावयाच्या तारखा | दि. १२.०९.२०२६ | दि. १६.०९.२०२६ | दि. १९.०९.२०२६ |
| उपरोक्त सर्व परीक्षा अर्जाच्या याद्या जमा करावयाचा दिनांक | दि. १५.०९.२०२६ | दि. २२.०९.२०२६ | |

१. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना जो युझर आयडी (ई-मेल आयडी) व पासवर्ड वापरला आहे. त्या लॉगीनमधून परीक्षा अर्ज व शुल्क भरणेची कार्यवाही पूर्ण करावी.

D:\RVB 2026\Submission 2026\Circular regarding Exam form Oct 2026 (1).docx

२. सर्व विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी सत्रनिहाय परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क त्यांच्या लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने भरणेचे आहे. परीक्षा अर्ज व शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यास परीक्षेस बसता येणार नाही.

३. प्राप्त विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज अभ्यासकेंद्रामार्फत त्यांच्या लॉगीनमधून अॅप्रुव्हल करणेचे आहे. परीक्षा अर्ज अॅप्रव्हुल झालेले नाहीत अशा विद्यार्थ्याचे परीक्षा क्रमांक बैठक क्रमांक जनरेट होणार नाहीत व अशा विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी बसता येणार नाही.

४. विषयासंदर्भातील माहिती दूरशिक्षण केंद्राच्या विद्यापीठ संकेतस्थळावर विषयनिहाय उपलब्ध आहेत. तसेच आवश्यक भासल्यास या केंद्रातील शिक्षक व अथवा मेटॉर यांचे मार्गदर्शन घ्यावे.

५. विद्यार्थ्यांना परीक्षा अर्जाबरोबर भराव्या लागणाऱ्या आवश्यक शुल्काची माहिती द्यावी. याबाबत विद्यापीठ संकेतस्थळावर परीक्षा शुल्काची माहिती उपलब्ध असून ती विद्यार्थ्यांना अवगत करावी.

६. याबाबत विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणेबाबत मार्गदर्शन करावे.

७. विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरणेबाबतही मार्गदर्शक सूचनाही सोबत जोडलेल्या आहेत. त्या विद्यार्थ्यांना अवगत कराव्यात.

८. सदरची प्रक्रिया वेळेत पूर्ण करून घेवून विद्यार्थ्यांचे अर्ज व कागदपत्रे विद्यापीठाने केलेल्या विहित मुदतीत सादर करावीत.

९. अभ्यासकेंद्रामार्फत परीक्षा अर्ज व शुल्क पावती या केंद्राकडे सादर करू नयेत. परीक्षाविषयक अर्ज व शुल्क भरलेली यादी फक्त या केंद्राकडे विषयनिहाय सादर करणेची आहेत.

Shinde

उपकुलसचिव

प्रति,

सर्व केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

प्रत : -

१. मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
२. उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
३. सहाय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
४. कक्ष अधिकारी/अधीक्षक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
५. सर्व संबधित समन्वयक व हंगामी सहाय्यक प्राध्यापक : - जरूर त्या योग्य त्या कार्यवाहीस्तव
६. आयटी को-ऑडीनेटर
७. सर्व संबंधित प्रवेश व प्रशासकीय विभागातील सेवक : - जरूर त्या योग्य त्या कार्यवाहीस्तव
८. संगणक चालक : - सदरचे परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरळीतपणे सुरू राहणेसाठी व इतर अनु ंगिक कार्यवाहीबाबत सर्व संबंधित विभाग व संबंधिताशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करून घ्यावी. याबाबत अभ्यासकेंद्राना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निवारण वेळेत करणेबाबत मार्गदर्शन करावे.